प्रेनोट दि.१३/०३/२०१९

## शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## शिवाजी पुलावरुन नदीपात्रात पडलेल्या महिलेस तात्काळ वैदयकीय सेवा पुरवलेबाबत

दि.११/०३/२०१९ रोजी रात्रौ ०२.०० वा ते ०२.३० वा चे दरम्यान शिवाजी पुल महानगर पालिका पुणे या पुलावरुन एक महिला नदी पात्रात पडलेली असलेबाबत नियंत्रण कक्षाकडुन माहिती मिळाल्याने रात्रगस्तीकरिता असलेले श्री बापु शिंदे पोलीस निरीक्षक गुन्हे, महिला पोलीस उपनिरीक्षक दिक्षा झडते तसेच शिवाजीनगर मार्शलचे कर्मचारी समीर शेख व गोपीनाथ कर्चे असे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले त्यावेळी एक महिला नदीपात्रात पडलेली असल्याचे दिसल्याने तात्काळ फायरबिग्रेडला बोलावुन घेवुन फायरबिग्रेड व जीवरक्षक राजेश दामोदर काची रा. जुनातोफखाना शिवाजीनगर पुणे यांचे मदतीने सदर महिलेस नदीपात्रातुन बाहेर काढुन सदर महिलेवर उपचार करणेकरिता जीवरक्षक राजेश काची यांचे मदतीने ससुन हॉस्पीटल येथे घेवुन जावुन तिस उपचार कामी ससुन हॉस्पीटलमध्ये दाखल केले त्यावेळी मपोउनि दिक्षा झडते तिला तिचा नाव पत्ता विचारला त्यावेळी तिने तिचे नावपत्ता समिरा बर्शी वय २६ वर्षे रा. सिटी पोस्ट पुणे असे असल्याचे सांगितलेले आहे.

दि. ११/०३/२०१९ रोजी ०२.०० वा ते ०२.३० वा चे दरम्यान शिवाजी पुलावरुन नदीपात्रात पडलेल्या महिलेस तात्काळ नदीपात्राचे बाहेर काढुन तिस पुढील उपचार कामी तात्काळ ससुन हॉस्पीटल औषधउपचारासाठी दाखल केल्याने सदर महिलेस तात्काळ औषोधउपचार मिळणेस मदत झालेली असुन सदर महिला ही शिवाजी पुलावर बसलेली असताना तिला अचानकपणे भुवळ येवुन नदीपात्रात पडलेली असल्याचे सांगुन तिचे कोणाविरुध्द तक्रार नसल्याचे सांगत आहे.

वरील नमुद कारवाई ही श्री बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो स्टे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री बापु शिंदे पो नि गुन्हे, मपोउनि दिक्षा झडते, पोशि समिर शेख, गोपीनाथ कर्चे, पो ना मिराज सौदागर यांनी केलेली आहे.

**(बाळासाहेब कोपनर)**

**वरीष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**